**कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग क्र.२, कोल्हापूर**

सिंचन भवन ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३

e-mail : eempd2_kolapr@wrd.maharashtra.gov.in

☎ ०२३१-२६५०५०२

जा.क्र.मप्रवि-२/पशा/आ-१/ 3960 /२०२१ दिनांकः- 21/10/2022

**प्रति**,
मा.अधीक्षक अभियंता,
जलसंपदा ई प्रशासन मंडळ,
जलसंपत्ती भवन,
कोथरुड , पुणे – ४११०३८.

**विषय**:- सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)सवंर्गात घेणे बाबत.

**संदर्भ** १) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण - २७१५/प्र.क्र.१००/१३दिनांक १७/१२/२०१६.
२)मंडळ कार्यालयाचे पत्र क्रं /जा.क्र/कोपामं/५४६३/दि २१/१०/२०२२

उपरोक्त विषयांकींत प्रकरणी सादर करणेत येते की, सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर नियुक्तीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज व जाहीरात प्रसिध्द करणे साठी या कार्यालयास संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये अधीक्षक अभियंता,कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,कोंल्हापूर यांनी प्राधिकृत केले आहे. त्यास अनुसरुन संदर्भिय पत्र क्रं १ च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार करार पध्दतीने कनिष्ठ अभियंता(स्थापत्य) पदावर नियुक्तीसाठीची जाहीरात व त्यातील शर्ती व अटी तसेच विहीत नमुन्यातील अर्ज सोबत सादर करणेत येत आहे. सदरची जाहीरात जलसंपदा विभागाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी ही विनंती .

हे आपले माहितीसाठी व सत्वर कार्यवाहीसाठी सविनय सादर.

सोबत –वरीलप्रमाणे

कार्यकारी अभियंता,
मध्यम प्रकल्प विभाग क्र.२,
कोल्हापूर.

प्रत :- मा.अधीक्षक अभियंता,कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,कोल्हापूर यांना माहितीकरीता सविनय सादर.
सोबत –वरीलप्रमाणे

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,**

**कोल्हापूर यांचे कार्यालय,**

सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर

ई-मेल :- klpsekickop@gmail.com दूरध्वनी क्र. (०२३१) २६५१२६०, २६५३१८२

## सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी घेणे बाबत

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७.१२.२०१६ अनुसार खालील संवर्गातील फक्त जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करार पध्दतीने या मंडळांतर्गत कार्यरत असलेल्या विभागांतर्गत कोल्हापूर / सांगली जिल्हयांतर्गत **क्षेत्रियस्तरावरील सिंचन व्यवस्थापन व बांधकामाधीन प्रकल्पांची कामे पुर्ण करण्यासाठी एक वर्षासाठी** करावयाची आहे. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांची सेवा अधीक्षक अभियंता कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर यांचे अधिनस्थ कामांसाठी राहील. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांना सिंचन व्यवस्थापन व प्रकल्प बांधकाम या प्रकारचे सखोल ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज **कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग क्र.2, सिंचन भवन परिसर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३** यांच्याकडे **दिनांक ०१.११.२०२२ ते दिनांक १०.११.२०२२ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत)** प्राप्त होतील याप्रमाणे पोष्टाव्दारे सादर करावेत किंवा कार्यालयामध्ये प्रत्यक्ष द्यावेत. अर्जाचे पाकीटावर " सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर नेमणूक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहिण्यात यावे. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. सदर नेमणूका/ नियुक्ती समिती मार्फत मुलाखती व्दारे करण्यात येतील व सदर नेमणूकीचे आदेश हे सक्षम स्तरावरील अंतिम मान्यतेनंतरच निर्गमित करणेत येतील.

**करार पध्दतीने भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशील | जलसंपदा विभागातुन खालील पदावरुन सेवानिवृत्त |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (पदाची संख्या 05) | क्षेत्रिय स्तरावरील सिंचन व्यवस्थापन/ बांधकामाधीन पाटबंधारे प्रकल्पांची कामे | सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / सहा.अभि.श्रेणी.२ / शाखा अभियंता / उपविभागीय अभियंता / अधिकारी (स्थापत्य) |

सदर नेमणूकीकरीता लागू असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग क्रं.2, कोल्हापूर या कार्यालयात उपकार्यकारी अभियंता यांचेकडे तसेच शासनाच्या जलसंपदा विभागाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग क्र.2, सिंचन भवन परिसर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३ | (०२३१) -२६५०५०२ |

PBlane

उप अधीक्षक अभियंता,
कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,
कोल्हापूर.

सही/-
अधीक्षक अभियंता,
कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,
कोल्हापूर.

❈ सदर नेमणुका हया खालील सर्वसाधारण शर्ती व अटींच्या अधिन राहतील.